**परिविक्षाधीन अधिकाऱ्याची सेवा समाप्त करणेबाबत.**
**श्री. विशाल महादेवराव भेदुरकर, लेखाधिकारी संवर्ग,**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
**शासन आदेश :**-संलेको-२०२४/प्र.क्र.८१/कोषा प्रशा -२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २० जून, २०२४.

**वाचा :-** १) वित्त विभाग, शासन आदेश, क्र.ससभे-२०१२/प्र.क्र.१९७/कोषा प्रशा-२, दि.१९.०३.२०१३,
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा-राप/कार्या-६/श्री.भेदुरकर/अनधिकृत गैरहजेरी/०४.२४/५१८/४६७/२०६६, दि.२२.०४.२०२४,
३) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा-राप/कार्या-६/श्री.भेदुरकर/अनधिकृत गैरहजेरी/०५.२४/६६६, दि.१०.०५.२०२४,
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या-८, दि.२२.०६.२०२१,

**प्रस्तावना :-**

श्री.विशाल महादेवराव भेदुरकर यांची संदर्भ वाचा क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०११ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखाधिकारी या पदावर खुल्या प्रवर्गातून महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम क्रमांक ९ (४२) मध्ये विहित केलेल्या परिविक्षाधीन या संज्ञेच्या व्याख्येनुसार तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. श्री.वि.म. भेदुरकर हे दि.०१.०१.२०१३ रोजी परिविक्षाधीन लेखा अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. प्रचलित नियमानुसार सरळसेवेने नियुक्त अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी हा (प्रशिक्षण कालावधी धरुन) रुजू झाल्याच्या दिनांकापासून २ वर्षाचा आहे. त्यानुसार श्री.भेदुरकर यांचा परिविक्षाधीन कालावधी दि.३१.१२.२०१५ रोजी समाप्त होणे अपेक्षित होते.

२. श्री.भेदुरकर यांना परिविक्षाधीन कालावधी पुर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुल्यांकन अहवाल सादर करण्याबाबत वारंवार लेखा व कोषागारे,संचालनालयामार्फत कळविण्यात आल्यानंतरही त्यांनी मुल्यांकन अहवाल संचालनालयास सादर केला नाही. त्यामुळे श्री. भेदुरकर यांचा परिविक्षा कालावधी समाप्त न होण्यास ते स्वत: जबाबदार आहेत.

३. श्री. भेदुरकर, हे जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ येथे लेखाधिकारी पदावर कार्यरत असतांना दि.०२.०९.२०१३ ते दि.२०.०७.२०१३ या कालावधीत विनापरवानगी ३९७ दिवस व समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, बुलढाणा येथे दि.३०.०७.२०१६ ते दि.०५.०८.२०१९ या कालावधीत लेखा अधिकारी पदावर कार्यरत असतांना ८९५ दिवस विनापरवानगी गैरहजर होते. तसेच कृषि आयुक्तालय, पुणे यांनी दि.०७.०७.२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविल्यानुसार श्री. भेदुरकर हे कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयात दि.०८.०८.२०१९ रोजी हजर झाल्यानंतर ते एकुण ९६७ दिवस गैरहजर होते. श्री. भेदुरकर हे वैद्यकीय कारणास्तव कार्यालयात अनुपस्थित असल्याने त्यांना वैद्यकीय मंडळापूढे उपस्थित राहण्याबाबत कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यालयाने कळवूनही श्री.भेदुरकर वैद्यकीय मंडळापूढे हजर झालेले नाहीत.

तद्नंतर, श्री.भेदुरकर, यांची दि.०२.०६.२०२३ च्या आदेशान्वये बदलीने लेखा अधिकारी, पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई या पदावर पदस्थापना करण्यात आली. तथापि, श्री.भेदुरकर हे पदस्थापनेच्या पदावर अद्याप हजर झालेले नाहीत.

२१/६/२४

कृ.मा.प.

809/2024/1163
24/6/24

D:\gaurav dande\सेवा समाप्त\श्री. भेदुरकर.docx

४. श्री.भेदुरकर हे MPSC/UPSC चे Classes घेत असून You Tube वर त्यांचे स्पर्धा परीक्षा व इतर विषयांबाबतचे मार्गदर्शन करणारे अनेक व्हिडिओ उपलब्ध आहेत. याबाबत त्यांनी शासनाची परवानगी घेतलेली नसल्याने त्यांनी म.ना.से. (वतर्णूक) नियम १९७९ च्या नियम १६ चा भंग केलेला आहे.

५. श्री.भेदुरकर यांच्या दि.१९.०३.२०१३ रोजीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र.४ मध्ये पुढीलप्रमाणे अट नमूद आहे.

**" परिविक्षाधीन अधिकाऱ्याने कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा विहित परिविक्षा कालावधीमध्ये उत्तीर्ण न केल्यास अथवा त्यांची वर्तणूक अयोग्य अथवा अननुरुप आढळल्यास तो/ती कोणतीही पूर्व सूचना न देता सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल. "**

६. श्री. विशाल महादेवराव भेदुरकर हे दि.०१.०१.२०१३ रोजी शासन सेवेत रुजू झाल्यानंतर आतापर्यंत त्यांच्या ११ वर्षाच्या सेवाकाळात ते जवळपास ७ वर्षाहुन अधिक काळ विनापरवानगी गैरहजर/रजेवर आहेत. तसेच सद्यस्थितीत श्री.भेदुरकर हे दि.०१.०२.२०२२ पासून विनापरवानगी गैरहजर आहेत. श्री. भेदुरकर यांना अनधिकृत गैरहजेरीच्या अनुषंगाने लेखा व कोषागारे, संचालनालयाकडून बजावण्यात आलेल्या ज्ञापनांना त्यांनी समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही. श्री.भेदुरकर यांना मुल्यांकन अहवाल सादर करण्याबाबत वारंवार लेखा व कोषागारे, संचालनालयाकडून कळविण्यात आले परंतू अद्यापपर्यंत त्यांनी संचालनालयास मुल्यांकन अहवाल सादर केलेला नसल्यामुळे त्यांचा परिविक्षा कालावधी अद्याप समाप्त करण्यात आलेला नाही. म.ना.से.(वर्तणूक) नियम-१९७९ मधील नियम-१६ नुसार शासनाच्या परवानगीशिवाय श्री. भेदुरकर हे MPSC/UPSC चे Classes घेत आहेत तसेच You Tube वर स्पर्धा परीक्षा व इतर विषयांबाबतचे मार्गदर्शन करत आहेत. श्री.भेदुरकर यांची त्यांच्या सेवा कालावधीतील वर्तणूक अशोभनीय आहे तसेच श्री. भेदुरकर यांचा परिविक्षा कालावधी समाप्त न होण्यास ते स्वत: जबाबदार आहेत. त्यामुळे श्री. भेदुरकर यांच्या सेवा समाप्त करण्याचा प्रस्ताव संचालनालयाने शासनास सादर केलेला आहे. त्यानुसार शासन आता, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: शासन आदेश :-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद सर्वंकष पार्श्वभूमी विचारात घेता, श्री.विशाल महादेवराव भेदूरकर, लेखाधिकारी यांच्या सेवा त्यांच्या **दि.१९.०३.२०१३ रोजीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र. ४, तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. परिवी- २७१५/प्र.क्र.३०२/कार्या-८, दि.२२.०६.२०२१, अनु.क्र. ९(२) मधील नमुद तरतूदीनुसार** या शासन आदेशाच्या दिनांकापासून समाप्त करण्यात येत आहे. श्री.विशाल म. भेदुरकर यांना यापुढे त्याच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखाधिकारी या पदावरील सेवेचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच त्यांनी यापुढे नियुक्तीसंदर्भात केलेल्या कोणत्याही दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांनी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन शासनास अहवाल सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ता.र.पवार)
**अवर सचिव, वित्त विभाग.**

**प्रत :-**

१) अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, (पत्राद्वारे)
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
५) अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
६) मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
९) संबंधित अधिकारी,*
१०) निवड नस्ती, कोषा प्रशा -२, * (संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे मार्फत)

D:\gaurav dande\सेवा समाप्त\श्री. भेदुरकर.docx